सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

■ पुणे ■ वर्ष : ५
■ अंक : २०
■ पाने : ४
■ मूल्य : ३ ₹

संपादक : घनश्याम पाटील

Website :www.chaprak.com

■ सोमवार, दि. ०८ ते १४ जून २०१५ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

Licensed to post without prepayment of postage no. WPP - 14 Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 10/06/2015

KaMant
कामंत मसाले
एकदा वापरून पहाच!
किंग ऑफ टेस्ट
व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले
संपर्क : मच्छिंद्र कामंत, (सी.एम.डी), तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४, हिंजेवाडी, पुणे - ४०००२७ दूरध्वनी : ०२०-६५२९२४००
Email : dkamant@rediffmail.com Web. : www.kamantmasale.com

# बाप दाखव नाहीतर श्राद्ध घाल!





संपादकीय
घनश्याम पाटील - ७०५७२९२०९२

***गुन्हेगारी,*** महागाई आणि भ्रष्टाचार याला वैतागलेल्या जनतेने कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेसला घरी बसवत भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आणले. निवडणुकीपूर्वी आघाडीच्या विरूद्ध राळ उडविणाऱ्या भाजपा नेत्यांनी सत्ता हाती आल्यानंतर मात्र आपले रंग दाखवायला सुरूवात केली आहे.

राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या चमुंचा सिंचन घोटाळा बाहेर काढल्याच्या आविर्भावात भाजपने त्यांच्यावर वाटेल तसे आरोप केले. राष्ट्रवादीने मागच्या काही वर्षात सत्तर हजार कोटींचा सिंचन घोटाळा केल्याचे सातत्याने समाजमनावर बिंबवले. त्या अनुषंगाने राष्ट्रवादीवर टीका करण्याची एकही संधी भाजपायींनी सोडली नाही. 'अजित पवारांच्या विरूद्ध भ्रष्टाचाराचे गाडीभर पुरावे देऊ' असे निवडणुकीदरम्यान देवेंद्र फडणवीस यांनी घसा ताणून सांगितले. मात्र आता लाचलुचपत प्रतिबंधक विभागा (एसीबी)कडून चौकशी सुरू झाल्यानंतर सगळेच मूग गिळून गप्प आहेत. दोनवेळा नोटीस काढूनही अजित पवारांना एसीबीपुढे चौकशीसाठी न जाता लेखी उत्तर देण्याची मुभा देण्यात आली आहे. 'आपण दोघे भाऊ-अर्धे अर्धे खाऊ' अशातला तर हा प्रकार नाही ना, याबाबत लोकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे.

अजित पवारांचा स्वभाव फटकळ असला तरी त्यांची वृत्ती कार्यतत्पर आहे, त्यांचा प्रशासनावर जबरदस्त वचक आहे हे महाराष्ट्राने पाहिले आहे. आज देशाला नरेंद्र मोदी यांच्या रूपाने कणखर आणि मुख्य म्हणजे प्रशासनावर वचक असलेला पंतप्रधान मिळाला आहे. राज्यापुरते बोलायचे झाल्यास असेच नेतृत्वगुण असलेला अजित पवारांखेरीज दुसरा नेता दिसत नाही. सत्तेत असताना त्यांनी ज्या तडफेने कामे मार्गी लावली ती पाहता त्यांच्यावर आरोप-प्रत्यारोप होणे स्वाभाविक मानायला हवे. आता मात्र भाजपा सरकारची अजितदादांवर असलेली मेहरनजर पाहता दोनच निष्कर्ष निघतात. एक म्हणजे भाजपवाल्यांनी त्यांच्यावर केवळ राजकीय उद्देशाने पुराव्याअभावी आरोप केले किंवा त्यांचे अजित पवार आणि राष्ट्रवादीसोबत साटेलोटे झाले आहे.

असे साटेलोटे करण्याएवढी मुत्सद्देगिरी भाजपवाल्यात अजून तरी मुरलेली दिसत नाही. त्यामुळेच ते भांबावून गेले आहेत. छगन भुजबळ, समीर भुजबळ यांना चौकशीसाठी बोलावले असताना एसीबीकडून अजित पवार, सुनील तटकरे यांना मात्र सूट दिली जात आहे. सिंचन घोटाळा प्रकरणी पवार, तटकरे यांना नोटीसा गेल्या आहेत. पर्यावरण विभागाची मान्यता नसताना प्रकल्पाच्या कामाला सुरूवात केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. कोंढाणा प्रकल्पाची किंमत ५६ कोटींवरून ६१४ कोटीवर नेणे आणि काळू प्रकल्पाचा खर्च ३८२ कोटींवरून ७०० कोटींवर नेण्याचे आरोप त्यांच्यावर आहेत. असे सारे असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बजावलेल्या नोटीसला समक्ष जाऊन उत्तर देण्याऐवजी लेखी उत्तर देण्याची मुभा त्यांना देण्यात आल्याने सिंचन घोटाळ्याच्या चौकशी समितीवर आणि सरकारच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

हे कमी म्हणून की काय लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी अजित पवार यांना शासनाकडूनच माहिती हवी आहे. त्यासाठी त्यांनी जलसंपदा विभागाकडे माहिती अधिकार कायद्याअंतर्गत मागणी केल्याचे वृत्त आहे. याचाच अर्थ आपण किती घोटाळे केले याची माहिती सरकारने ठेवावी आणि ती आम्हाला उपलब्ध करून द्यावी, त्यासंदर्भात त्यांच्याकडे किती माहिती आहे आणि त्यासाठी आवश्यक असणारे किती पुरावे आहेत हे तपासून पाहणे त्यांना गरजेचे वाटत असावे.

मंत्रालयाला आग लागली तेव्हा 'महाराष्ट्र शंभर टक्के भ्रष्टाचार मुक्त झाला, सर्व फाईल्स जळाल्या' अशी प्रतिक्रिया आम्ही दिली होती. अजित पवार यांना मिळत असलेली सूट पाहता त्यातील तथ्य समोर येत आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्यांनी केलेल्या अवाढव्य घोटाळ्याचे चित्र रंगवताना भाजपवाल्यांनी जंग जंग पछाडले होते. मात्र सत्तेत येऊन त्यांना एक वर्ष पूर्ण होत आले असताना अजित पवार किंवा त्यांच्या सहकाऱ्यांचा अजून तरी एकही घोटाळा सरकारला सिद्ध करता आला नाही.

छगन भुजबळ यांची लाचलुचपत प्रतिबंध विभागाने बोलवून घेऊन चौकशी केली. त्याउलट अजित पवार यांना दोनवेळा नोटीस पाठवूनही ते आले नाहीत. ते महाराष्ट्राबाहेर असल्याने लेखी उत्तर देतील असे सांगण्यात आले आणि एसीबीकडून ते मान्यही करण्यात आले. किंबहुना सिंचन घोटाळ्यात अजित पवार यांना अजून आरोपी ठरवले नसल्याने त्यांना एसीबीच्या कार्यालयात चौकशीसाठी येण्याची सक्ती करता येत नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. ज्या सिंचन घोटाळ्यावरून जंग जंग पछाडले त्यात अजित पवारांना अजून आरोपीही करण्यात आले नसल्याने भाजपवाल्यांचा तो केवळ आततायीपणा होता का, हे तपासून पहावे लागेल. जर अजित पवार यांच्याविरूद्ध काही पुरावेच नसतील आणि 'खोटे बोल पण रेटून बोल' या न्यायाने सातत्याने जनतेवर ते बिंबवण्यात आले असेल तर हे गंभीर आहे. सत्तेसाठी वाटेल ते या न्यायाने बिनबुडाचे आरोप करणारे भाजपवाले कांगावा करत आहेत.

'सत्तेत असताना राष्ट्रवादीकडून कोणतेही घोटाळे अथवा नियमबाह्य काम झाले नाही. पवार, तटकरे, भूजबळ यांच्यावर झालेले घोटाळ्याचे आरोप निराधार असून आम्ही चौकशीला जाण्यास तयार आहोत,' असे राष्ट्रवादीकडून सातत्याने सांगण्यात येत आहे. 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध घाल' या म्हणीप्रमाणे राष्ट्रवादीच्या नेत्यांवरील आरोप सिद्ध करणे किंवा ती केवळ राजकीय आरोपबाजी होती हे मान्य करणे असे दोनच पर्याय सत्ताधाऱ्यांपुढे आहेत. भ्रष्टाचाराचे 'बैलगाडी'भर पुरावे असल्याच्या बाता करणारे देवेंद्र फडणवीस मोदी शेठचे दिवे ओवाळण्यातच मशुल आहेत.

सामान्य माणूस अजूनही भरडला जातोय. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत. श्रमाला प्रतिष्ठा नाही. गावपातळीपासून सर्वत्र छोटे-मोठे घोटाळे सुरूच आहेत. महागाई वाढतच चाललीय. दुष्काळ, नापिकी यामुळे जगणे अवघड झालेय. जे आघाडीच्या काळात होते तेच भाजपेयींच्या कारकिर्दीत आहे. राष्ट्रवादीवाल्यांना 'घोटाळेबहाद्दर' समजून भाजपने आक्रमक प्रचार केला. लोकांच्या मनात खदखदणारा राग व्यक्त केला आणि सत्तेची सूत्रे हस्तगत केली. मात्र तेही आता त्याच वाटेवरून जात असल्याचा समज सामान्य माणसाच्या मनात निर्माण होतोय.

सिंचन घोटाळाच नव्हे तर अन्य असंख्य घोटाळे त्वरीत उघड व्हावेत आणि त्यातील दोषींवर कठोर कारवाई व्हावी. मात्र हे करताना अकारण राजकारण आणि आरोप-प्रत्यारोप करून सामान्य माणसाला खेळवत ठेऊ नये, अन्यथा त्यांच्या भावनांचा स्फोट झाला तर सरकारला पळता भुई थोडी होईल.

■■

# सरिता कमळापूरकर यांच्या 'माझी कविता'चे १७ जूनला प्रकाशन

**पुणे, (प्रतिनिधी) :** वैविध्यपूर्ण विषयांवरील दर्जेदार कविता लिहिणाऱ्या कवयित्री शकुंतला तथा सरिता कमळापूरकर यांच्या 'माझी कविता' या संग्रहाचे प्रकाशन बुधवार दि. १७ जून २०१५ रोजी होत आहे. पुण्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात होणाऱ्या या सोहळ्यासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक आणि समीक्षक प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस, विख्यात कवयित्री अंजली कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत.

उत्तमोत्तम कवितासंग्रह प्रकाशित करण्याची परंपरा जोपासणाऱ्या 'चपराक प्रकाशन'तर्फे हा काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे. लेखन आणि सादरीकरण या दोन्ही आघाड्यांवर कमळापूरकर यांच्या कविता अव्वल ठरतात. त्या स्वतः उत्तम गायिका असल्याने यातील अनेक कविता गेय स्वरूपाच्या आहेत. यातील बहुतेक कवितांना विषयानुरूप त्यांनीच मोहक चित्रे रेखाटली आहेत. प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांची विवेचक प्रस्तावना या संग्रहाला लाभली असून मुखपृष्ठ समीर नेर्लेकर यांनी साकारले आहे.

शासकीय नोकरीच्या निमित्ताने कमळापूरकर यांना बराच काळ पुणे-मुंबई असा रोजचा प्रवास करावा लागला. यासाठी लागणाऱ्या वेळेचा सदुपयोग करत त्यांनी चिंतनातून त्यांच्या कवितांना जन्म दिला आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया या देशातील वास्तव्याने त्यांचे जीवनानुभव समृद्ध आहे. सामान्य माणसाची सुखदुःखेही त्यांनी डोळसपणे टिपली आहेत. संग्रहाचे नाव 'माझी कविता' असे असले तरी या कविता कमळापूरकर यांच्यापुरत्या मर्यादित राहिल्या नसून त्या सार्वत्रिक आहेत.

'माझी कविता' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन १७ जून रोजी सायंकाळी ६ वाजता होत असून यावेळी युवा गायिका मधुरा पाटील सरिता कमळापूरकर यांच्या निवडक कविता सुरेल आवाजात सादर करेल. या सोहळ्यासाठी काव्यरसिकांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन 'चपराक प्रकाशन'तर्फे करण्यात आले आहे.



# मानवाधिकार संकल्पनेच्या विपर्यासाचा बळी

**सुखद बालपण... खुलणारं तारुण्य... तारुण्यातच सुरु झालेली रुग्णसेवा... सत्त्वातून आणि तत्त्वातून आलेला प्रामाणिकपणा... प्रामाणिकपणामुळे अप्रामाणिकपणासाठी ओढलेले शब्दाचे आसूड.... आसूडामुळे नराधमानं उगवलेला सूड.... आणि मग एका भयानक जीवनाची झालेली सुरुवात... अरुणा शानबाग...**



गेल्या महिन्यात अरुणा शानबाग या भयानक जीवनाची मृत्युनं अखेर सुटका केली. काळाचा प्रवाह एकीकडे वाहत असताना एक जीव निपचित पडून आयुष्याचे भेसूर पैलू अनुभवत होता. होणाऱ्या वेदनांपेक्षा त्या सांगता न येणं किती वेदनादायी असतं हे जिवंत असून निर्जिवासारखं पडलेल्या अरुणा शानबागकडे बघून बघवत नव्हतं (रोज तिथल्या कर्मचाऱ्यांना आणि कधीतरी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून तुम्हा-आम्हालाही). एक नाही दोन नाही, दहा नाही वीस नाही तर तब्बल बेचाळीस वर्ष. निसर्ग, मेडिकल सायन्स आणि अरुणा आहे तशी जिवंत राहावी असं वाटणाऱ्यांच्या साहाय्यानं वेदनेचा दिनक्रम सुरु होता (चोवीस तास तीनशे पासष्ठ दिवस). अरुणा यातून बरी होऊ शकणार नाही, सायन्स तिला सद्यस्थितीच्या पलिकडे नेऊ शकणार नाही असं वाटणाऱ्यांनी मग अरुणाला इच्छा मरण द्यावं यासाठी याचीकाही दाखल केली गेली (काही देशांमध्ये ज्याप्रमाणे हा कायदा आहे त्याप्रमाणे). अनेक वर्ष यावर न्यायालयात खल झाल्यानंतर न्यायालयानं अरुणाला इच्छा मरण देता येणार नाही असा निकाल दिला आणि केईएममधल्या नर्सेससह अरुणा जिवंत असायला हवी असं वाटणाऱ्यांनी आनंद व्यक्त केला. ज्या नर्सेसनी अरुणाची सेवा केली त्यांना आनंद वाटणं हे साहजिक होतं, त्यांना तिच्याबद्दल वाटणारा जिव्हाळा वेदनांपेक्षा अस्तित्वाला महत्व देत होता. अरुणाच्या घरातल्यांनी, नातेवाईकांनी विशिष्ठ काळानंतर अरुणाच्या तब्बेतीची चौकशी करणंही बंद केलं होतं. पण या नर्सेसची अरुणाबद्दल वाटणारी करुणा कधीही कमी झाली नाही (जगात परमेश्वराचं अस्तित्व असेल किंवा नसेलही पण परमेश्वरी संकल्पना बंदिस्त गाभाऱ्यातून बाहेर येऊन माणुसकीत उतरल्याचा हा पुरावा होता)

असं असलं तरीही एक प्रश्न हा उरतो, ज्या ठिकाणी शारिरिक क्षमता तळ गाठतात (कोणत्याही कारणाने असो) त्यावेळी केवळ आधुनिक वैद्यकीय शास्त्राच्याआधारे अरुणासारख्या जिवाची उलघाल बघत राहणं हाच पर्याय उरतो का? जर वैद्यकीय शास्त्रानं रुग्ण बरा होण्याच्या मर्यादा सांगितल्या त्याठिकाणी रुग्णाचे अमर्याद हाल का व्हावे? जो रुग्ण बरा होण्याची सुतराम शक्यता नाही (वर्षानुवर्ष कोमात गेलेले) त्याकडे केवळ रुग्ण न बघता नैसर्गिक क्षमतेचा अंत असलेलं शरीरशास्त्र म्हणून बघितलं जायला हवं. यासाठी काही देशांमध्ये मर्सी डेथ (मर्सी म्हणजे उपकार) ही तरतूद आहे. मर्सी डेथ याचा अर्थच स्थिती आणि अशा मृत्युचं महत्व सांगून जातो. असह्य स्थितीत असलेल्या एखाद्या व्यक्तीला मृत्यु देऊन त्याची सुटका करुन जणू त्याच्यावर उपकारच करणं हा त्याचा अर्थ. यासाठी आपल्याकडचा शब्द म्हणजे इच्छा मरण. इच्छा मरणाचा पर्याय जगातल्या फारच कमी देशांमध्ये स्विकारला गेला असेल पण पूर्णपणे नाकारलेला नाही आणि संख्येवर योग्य अयोग्य हे ठरवणं नेहमीच रास्त असू शकत नाही.(संख्या हा संख्याशास्त्राचा भाग आहे तो तर्क शास्त्राचा नाही)

अरुणासारखे किंबहुना त्यापेक्षा जर्जर झालेले अनेक जीव मृत्युचा धावा करत निपचीप पडून आहेत. स्वर्गाची रम्य कल्पना ऐकलेल्या या जगात वास्तविक नरक अनुभवत आहेत. या यातनांतून सुटका केवळ जीवनाचं शेवटचं प्रतिबिंब असलेल्या मृत्युखेरीज नाही हे माहित असूनही जीवनाचा विद्रूप चेहरा रोज बघत आहेत. असं असताना जगण्याचा अधिकार किंवा मानवाधिकार अशा गोंडस संज्ञांचा वापर याठिकाणी कितपत व्यवहार्य ठरतो? सरसकट इच्छा मृत्युचा विचार केला जावा असा आग्रह कोण धरेल, पण विशिष्ट केसेसच्या बाबतीत हा विचार करु नये का? इच्छा मृत्युचा दुरुपयोग या देशात केला जाणार नाही हे सांगण्यासाठी कुणा ज्योतिषाची गरज नाही (ज्योतिषी करतो तसा). पण तो तसा होणार नाही अशी याची काळजी घेता येणार नाही का? इतर अनेक बाबींबाबत जशी व्यवहार्य-अव्यवहार्य तर्कटं मांडली जातात तसं व्यवहार्य तर्कट याठिकाणी लावता येईल का? कायद्यामध्ये काही तरतूदी करुन पुन्हा सुस्थितीत येण्याची शक्यता नसलेले जर्जर आणि जीर्ण झालेले, यातना आणि वेदनांची परिसीमा गाठलेल्या अरुणासारख्या जीवांना सुटका देणं हा मानवाधिकार नाही का याचा विचार व्हावा!

महाभारतात युद्धादरम्यान बाणांच्या शय्येवर इच्छामृत्युचं वरदान लाभलेल्या भीष्मांनी अठ्ठावन्न दिवसांनंतर वेदनांचा निरोप घेतला अरुणा मात्र तब्बल ४२ वर्ष यमयातना भोगत होती. हिंदू धर्म संकल्पनेमध्ये जगामध्ये सात जण चिरंजीव (अमर) आहेत असं म्हटलं जातं त्यामध्ये वेदनेच्या रुपात अश्वत्थामा जिवंत आहे ही संकल्पना आहे. अरुणा याच संकल्पनेचा कल्पना न करता येणारा आणि मानवाधिकार संकल्पनेच्या विपर्यासाचा बळी ठरल्याचा पुरावा होती.

**▪ प्रशांत कुबेर**
म्हात्रे पुलाजवळ, पुणे
९७६६६७७७५८

---

# ‘माय तू मला बी अशीच सोडून जाशील’



***आकाशातील*** लाल गोळा खाली जात होता. तर याच्या पोटात भुकेचा गोळा उगवत होता. संपूर्ण दिवस दोन कटिंगवर काढत तो खूप धावला होता. रविवारी रस्त्यावर गर्दी असल्याने त्याने विकायला आणलेली खेळण्यातील विमाने सिग्नलवर थांबूनच चांगली विकली होती. रात्री माय अन् छोट्या भावासोबत गोडाधोडाच्या जेवणाची स्वप्ने तो पाहत होता. गोडाधोडाच्या जेवणात गोड काहीच नव्हतं, पण जेवण पोटभर होतं, ते ही कमाईचं. तेच गोड मानून खाऊन त्यालाच ते गोडाधोडाचं जेवण म्हणत होते. अंधार पडला. तो जेवणाची तयारी करू लागला. एरवी भाजीवाल्याची सडलेली भाजी अन् गिरणीतलं सांडलेलं पीठ खाणारं त्याचं कुटुंब दुकानातल्या पीठासोबत ताज्या भाजीचा स्वर्गिय आनंद लुटणार होतं. ठरल्याप्रमाणे सगळं झालं. आमावस्येची रात्र असूनही फूटपाथवरील त्यांच्या मूव्हेबल घरात गोडाधोडाच्या जेवणामुळे आनंदाचा प्रकाश पडला होता. उद्याचा विचार न करता तृप्त मनानं ते कुटुंब निद्रिस्त झालं.

दुसरा दिवस उजाडला. तो आज रूमाल अन् गजरे घेऊन रस्त्याच्या सिग्नलवर धावू लागला. दुपारपर्यंत फक्त एकच रुमाल विकला. कालचे पैसे कालच उधळले होते. आज हातात काहीच नव्हतं. संध्याकाळी गर्दी होईल म्हणून तो धावू लागला. माय अन् भाऊ दूर उभे राहून सारं पाहत होते. धावता धावता बसला आडवं जाताना त्याचा तोल गेला अन् क्षणार्धात हातातील रूमाल अन् गजरे रक्तात माखून निघाले. मर्त्य जग सोडून तो क्षणार्धात निघून गेला होता. थोडी गर्दी झाली. हॉर्न वाजू लागले. थोडावेळ ट्रॅफिक जाम. काही वेळात कोणीतरी रक्तात माखलेला मृत देह कडेला नेला.

माय अन् भाऊ अजूनही कडेला थांबून रडत होते. पोलिस आपल्याला पकडतील म्हणून ते पुढे सरकले नाहीत. मेलेल्याला पाहायचे का जिवंत असलेल्याला सांभाळायचे अशी मायची अवस्था झाली. शिवाय मेलेल्याला जाळायचं कुठं हा प्रश्नही होताच. दोघेजण फूटपाथवरून अश्रू ढाळत त्याच्या पासून दूर जाऊ लागले. २-३ किलोमीटरवर नदीच्या काठी येऊन बसले. कालचं गोडधोड जेवण पोटात मावलं होतं. पण आजचं दु:ख पोटात मावणारं नव्हतं. तिनं दादल्याची बॉडीपण अशीच सोडली होती अन् आता थोरल्या पोराची पण.

बराच वेळापासून हे सगळं पाहणारा ४-५ वर्षाचा धाकला निरागसपणे म्हणाला ‘माय, तू मला बी अशीच सोडून जाशील?’ मायकडं उत्तर द्यायला शब्द तर नव्हतेच पण अश्रू ढाळायला डोळ्यात पाणीपण नव्हतं.

**▪ व्यंकटेश कल्याणकर**
९४०४२५१७५१

---

# चारोळ्या

**गो-महिमा**
हिंदू संस्कृतीने ‘गाय’लाय
गोमातेचा महिमा
त्या संस्कृतीची लेकरे मात्र
करतात तिचा खिमा

**दुधाचं कर्ज**
‘आई’ आणि ‘गायी’च्या दुधावर
वाढ होते बालकाची
मोठेपणी तहान लागते
त्याच गोमातेच्या रक्ताची

**गो-मांस**
गाय नावाची माय
का रे तू खाय
दूसरं अन्न खाया
नाय का तुला काय?

**गो-मुत्र**
गाईचं मटन खाण्यापेक्षा
प्यावं सरळ गोमुत्र
व्याधी निवारणार्थ त्यात
असती औषधी सुत्र

**चटक**
गोमांस खाण्याची
लागलीया जिभेला चटक
आता कुणी खाल्लं तर...
होऊ शकते अटक

**तेहतीस कोटी**
गोमातेच्या पवित्र देहात
राहती देव तेहतीस कोटी
तिचा खात्मा करण्याची भाषा
कशी येते ओठी!

**औषधी मूल्य**
गाय भाकड झाली तरी
तिला आनंदाने पोसा
शेणा-गोमुत्राच्या विक्रीतून
भरपूर मिळेल पैसा

**गोवंश हत्या बंदी**
गोमाता का म्हणता
म्हणा कम माता
‘अच्छे दिन’ आलेत
त्या मातेला आता

**गोपाल कृष्ण**
पावित्र्य ज्ञात असूनसुद्धा
जो करतो गोमांस भक्षण
गोकुळातला तो गोपाल
कसं करेल त्याचं रक्षण?

**अंत समयी**
मृत्युनंतरसुद्धा माणसाला
गायच लागतो नि:संदेह
गवऱ्यामध्येच गायीच्या
जाळतात अचेतन देह



सम्राट नाईक, पुणे, ९८२३८१४२२५

# १८५७ च्या प्रलंयकारी उठावाची दुसरी बाजू

'**१८५७** चा जिहाद' हा एक महत्त्वाचा संशोधनात्मक ग्रंथ आहे. महाराष्ट्रात ऐतिहासिक संशोधन खूप झालं. इतिहास संशोधनाची मोठी परंपराच महाराष्ट्रात दिसते. सध्या ती काहीशी खंडीत झाल्यासारखी वाटते. मात्र काही संशोधक अक्षरश: मान मोडून काम करताना दिसतात. शेषराव मोरे हे त्यापैकीच एक. सावरकरांवरचे त्यांचे काही ग्रंथ गाजले. काश्मीर प्रश्नावरचा त्यांचा 'शापित नंदनवन' हा ग्रंथ आजही त्या विषयावरचा मैलाचा दगड मानला जातो. भारत पाकिस्तान फाळणीचादेखील खूप सखोल अभ्यास त्यांनी केला. त्यातून 'गांधी व काँग्रेसने अखंड भारत का नाकारला' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. '१८५७ चा जिहाद' हा ग्रंथदेखील असाच आहे. या ग्रंथाचं स्वरूप कसं आहे? काही जणांना तो एकांगी व एकसूरी वाटतो. कारण सत्तावन्नचा उठाव हा केवळ मुस्लिमांनी घडवून आणलेला जिहादी उठाव आहे अशीच या ग्रंथाची एकूण मांडणी आहे. त्यामुळे सत्तावन्नचा उठाव हा स्वातंत्र्य लढा होता या पारंपारिक समजाला मोरे इथे छेद देतात.

दुसरीकडे काही हिंदुत्ववाद्यांनी या ग्रंथाचे सोयीस्कर अर्थही काढले आहेत. एक वाचक म्हणून आपण मोरे यांच्या अभ्यासाला दाद दिल्याशिवाय मात्र रहात नाही. संपूर्ण ग्रंथात मोरेंनी पुराव्यांचा वर्षावच केला आहे. त्यांचे मुद्दे व निष्कर्ष खोडून काढणं सोपं नसतं. मोरे यांच्या मते हा उठाव अभ्यासण्यापूर्वी आपण त्याआधीचा शंभर वर्षांचा काळ अभ्यासला पाहिजे. त्यासाठी ते १७५७ ते १८५७ हा काळ महत्त्वाचा मानतात. हा शंभर वर्षांचा इतिहास अभ्यासला जात नाही म्हणून १८५७ चा उठाव नीट समजून घेता येत नाही यावर लेखक खूप ठाम आहे. यामुळं लेखकाने आधीच्या शंभर वर्षांचा इतिहासदेखील ग्रंथात मांडला आहे. टिपू सुलतानची कारकीर्द लेखक सांगतो. टिपू जिहादी मानसिकतेचा होता असंही लेखक सांगतो. बंगालमधील फर्जी चळवळीबद्दल लेखकानं लिहिलं आहे. सय्यद अहमद व राजा रणजीतसिंह यांच्यातील लढायांचे उल्लेख ग्रंथात आहेत. ''सय्यद अहमद शहीद यांनी सुरू केलेली चळवळ अनेक वर्ष धुमसत राहणाऱ्या अग्नीप्रमाणे होती व अनपेक्षितपणे ती १८५७ मध्ये वणव्यासारखी पसरली'' हा प्रा. एम. मुजीब यांचा निष्कर्ष. तो लेखकाने पृष्ठ क्र. ७० वर नमूद केला आहे. १८५७ च्या उठावाची बीजे त्याआधीच्या शंभर वर्षातच रूजत गेली. त्यासाठी एक जमीन तयार झाली या सर्व काळात. हा उठाव मुस्लिम साम्राज्य पुन्हा यावे यासाठीच होता, यावरही लेखक अत्यंत ठाम आहे. त्यामुळं त्यावेळच्या सत्ताधारी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या विरोधात जागोजागी उठाव झाले. त्याचा सगळा तपशील ग्रंथात वाचायला मिळतो. मोरे यांची लेखनशैली सोपी आहे. त्यामुळं संपूर्ण ग्रंथ एका लयीत वाचणं कठीण जात नाही. संशोधन व भाषाप्रभुत्व इथं पानोपानी जाणवतं.

लेखकाची ही एकूण मांडणी खळबळजनक ठरली. त्यावर वादही झाले. लेखकानं आपलं मत व निष्कर्ष पटवून देण्यासाठी जवळपास दिडशे संदर्भग्रंथ अभ्यासले आहेत. त्या ग्रंथांची यादी लांबलचक आहे. त्यातून लेखकाच्या अभ्यासाचा अफाट आवाका दिसतो. मात्र हा उठाव अथवा जिहाद सरसकट सगळ्याच मुस्लिम संस्थानिकांनी घडवून आणला का? तर तसं झालं नाही. हैद्राबादच्या निजामानं या जिहादला तेव्हा विरोध केला. उलट तो मोडून काढण्यासाठी त्यानं ब्रिटिशांना मदत केली. त्याबद्दल ब्रिटिश निजामाचे कृतज्ञ होते. भोपाळ हे मुस्लिम संस्थान होतं. त्याची बेगमदेखील ब्रिटिशनिष्ठ होती. निजामानं जिहाद पुकारला असता तर दक्षिण भारतात उठावाचा आगडोंब उसळला असता. तसं झालं नाही. मात्र जिथं उठाव झाले त्यामागं उद्देश 'जिहाद' हाच होता असं लेखक सांगतो. ईस्ट इंडिया कंपनीचं, पर्यायानं इंग्रजांचं राज्य आल्यामुळं मुसलमानांमध्ये असंतोष होता व आपलं गेलेलं साम्राज्य पुन्हा आणण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. 'धर्मासाठी व राज्यासाठी जिहाद करण्याची मुस्लिमांमध्ये धर्मनान्य पद्धत व दीर्घ परंपरा आहे व तेच १८५७ मध्ये घडलं होतं' अशी स्पष्ट भूमिका लेखकानं घेतली आहे.

उठावाच्या आधीच्या काळात झाशीची राणीदेखील ब्रिटिशनिष्ठ होती असं लेखक सांगतो. १८५४ साली झाशीचं संस्थान खालसा करण्यात आलं. १८५७ सालापर्यंत राणी ही अर्ज, विनंत्या करत होती. ब्रिटिशांची मनधरणी करत होती. ब्रिटिशांनी तिची भयानक कोंडी केली होती हे लेखकाच्या लिखाणावरून स्पष्ट होते; मात्र लेखक आणखी एक विलक्षण मुद्दा मांडतो. झाशीत तेव्हा नेमकं काय घडलं? तर झाशीतील अफगाण सैन्याचा राणीला खरा आधार होता. तिचे तीस अंगरक्षक होते. ते सर्वच्या सर्व अफगाण मुस्लिम होते. झाशीच्या संरक्षणासाठी दीड हजार अफगाण प्राणपणानं लढले. त्यांच्या पराक्रमाची नोंद प्रत्येक इतिहासकारानं घेतली आहे. घौसखान व खुदाबख्श हे राणीचे दोन तोफचालक. कमालीचे एकनिष्ठ होते ते राणीशी! ते दोघेही लढाईत ठार झाले. त्यांची आठवण म्हणून दोन चबुतरे आजही किल्ल्यात पहायला मिळतात असं लेखक सांगतो. इथं गोडसे भटजींचा संदर्भ लेखक देतो. अफगाणांचा हा पराक्रम गोडसे भटजींनीदेखील त्यांच्या 'माझा प्रवास' या पुस्तकात लिहून ठेवला आहे. गोडसे भटजी त्यावेळी झाशीतच होते हे विशेष! ते स्वत: सगळ्या घटना पहात होते व त्याची नोंद करून ठेवत होते. ही नोंद 'माझा प्रवास'च्या रूपानं दिसते. गुलमोहम्मद हा आणखी एक पठाण. राणीच्या मृत्यूपर्यंत तो तिच्यासह लढत होता व राणीच्या मारेकऱ्याला त्यानंच ठार केलं. या ग्रंथातले असे तपशील आपल्याला थक्क करून सोडतात व इतिहास हा वरवर अभ्यासण्याचा विषयच नाही याची जाणीव करून देतात.

मात्र दुसरीकडे या उठावाचं जिहादी स्वरूप कसं होतं? तर त्याकाळातील बंडखोरांचे सर्व जाहिरनामे हे कुराण व हादीसमधील वचनांवर आधारलेले होते याकडे लेखकानं लक्ष वेधलं आहे. सगळीकडचा जिहाद प्रामुख्यानं ब्रिटिशांविरूद्ध होता; मात्र त्यामुळं काही ठिकाणी हिंदू घाबरून गेले. उदा. दिल्लीतील हिंदूंनी ब्रिटिशांना मदत केली कारण त्यांनी या जिहादचा धसका घेतला होता असं लेखक सांगतो. तिकडं निजामही जिहादींच्या विरूद्ध होताच; मात्र १८५७ साली इंग्रज जिंकले म्हणूनच हिंदू सुरक्षित राहिले अशीच लेखकाची मांडणी आहे. त्यासाठी लेखकानं न. र. फाटकांचं मतही दिलं आहे. ''इंग्रजांमुळं हिंदू समाज दोन पिढ्या इस्लामच्या वर्चस्वापासून मुक्त झाला'' हे फाटक यांचं मत. ''फक्त जिहाद किंवा इस्लामचा बोलबाला स्वातंत्र्यलढ्यात बसणारा नाही'' हे फाटकांचं आणखी एक मत.

त्यावेळी अयोध्या एक प्रांत होता. तिथले बहुसंख्य तालुकादार व जमिनदार हिंदू होते. त्यांनी ब्रिटिशांना मदत केली त्यामागं जिहादमुळं आलेली अस्वस्थताच होती असा लेखकाचा निष्कर्ष आहे.

त्याकाळातल्या एका घटनेचे पडसाद नंतर बराच काळ उमटत राहिले. सगळ्यांनाच हादरवून टाकणारी ती घटना होती. कानपूरमध्ये ब्रिटिश स्त्रिया व मुलांचं अमानुष हत्याकांड झालं. त्यामागं आजीमुल्लाखान हा या उठावाचा सूत्रधारच होता असं म्हटलं जातं. आजीमुल्ला हा नानासाहेब पेशव्यांच्या मर्जीतला माणूस. दोघंही या उठावाची सूत्रे हालवत होते. त्यामुळं झालं असं, ब्रिटिश बायकामुलांच्या हत्येचा ठपका नानासाहेबांवरही येऊ पहात होता; मात्र या हत्याकांडात नानासाहेबांचा दूरान्वयानंही संबंध नव्हता हाच लेखकाचा निष्कर्ष आहे. आजीमुल्लानं सुरवरखान नावाच्या एका दुष्ट खाटकाकरवी हे क्रूर कृत्य केलं. कानपूरमधील कुप्रसिद्ध अंमलदारीण बेगम हिनंदेखील यात पुढाकार घेतला. या घटनेमुळं उठाव बदनाम झाला व ब्रिटिशांना राजरोस व क्रूर अत्याचार करण्यासाठी हातात कोलीतच मिळालं. त्याचेही तपशील ग्रंथात वाचायला मिळतात. उठावातल्या सगळ्या घनघोर लढाया ग्रंथात तपशीलानं आल्या आहेत.

आपला हा ग्रंथ लेखकानं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अर्पण केला आहे. बाबासाहेबांचं १८५७ बद्दलचं मतदेखील अर्पणपत्रिकेत नमूद करण्यात आलं आहे. ग्रंथाच्या मागील पानावर मायकेल एडवर्डस, जी. बी. मॅलेसन, एम. आर. गबीन्स, एम. टी. टायटस, प्रा. अझीझ अहमद, प्रा. मुजीब अश्राफ, एम. जे. अकबर यांची मतं दिली आहेत. ती मतं लेखकाच्या मताशी तंतोतंत जुळणारी आहेत.

ग्रंथातलं दहाव्या प्रकरणातलं शेवटचं एक वाक्य फार महत्त्वाचं. हिंदू मुस्लिम ऐक्याबद्दल लेखक म्हणतो, ''इतिहासाचा विपर्यास करून ऐक्य होत नसतं, खरा इतिहासही लपत नसतो. ऐतिहासिक वास्तव कठोरपणे समजून घेऊनच ऐक्याचे उपाय शोधता येतात, शोधावे लागतात यासाठीच हा प्रपंच आम्ही केला आहे.''




**१८५७ चा जिहाद**
**शेषराव मोरे**
**प्रकाशक :** अभिनव निर्माण प्रतिष्ठान
९८८११२२२७७/९८२२९५६७९५
**पृष्ठ :** ३४०, **मूल्य :** १५०



**ग्रंथ देवो भव!**
◆ **महेश मांगले**, पुणे
९८२२०७०७८५

# गोठलेला ज्वालामुखी

***रसिकाचा*** पुण्यातून फोन आला की मी अधिक जागृत होतो. मनातला विद्रोह, असंतोष वाहू लागतो. आणखी नवे विषय काय मिळतील. ते पाहू लागतो. पण मग वाटते आपली तरूणपिढी कितपत जागी झाली आहे? ती सजग आहे का? राजकीय हेतू असलेले, राजकारण्यांनी सांगितलेले आंदोलन वेगळे आणि मला वाटते, मला पटते, माझ्या मनात या ठिणग्या मावत नाहीत. अशा जळजळीत भावनेने केलेले परिवर्तनाचे कार्य निराळे.

'जरा 'समाजस्वास्थ्य' मासिक काढून लैंगिक शिक्षण, कुटुंबनियोजन, लोकसंख्या नियंत्रण यांचा प्रचार, प्रसार करा हो' असे रघुनाथराव कर्वे ह्यांना कुणी आदेश दिले नव्हते. कर्व्यांनी ते अंत:करणापासून केले. छळ सोसला. नोकरी सोडली.



मला तरूण पिढी फारच उदास, निष्क्रिय, स्वार्थी वाटते. कदाचित म्हणूनच आत्तापर्यंत या देशाने शत्रुशी युद्ध सुरू केले नव्हते. पोरे कॉलेजात येतात. मस्ती-मस्करी, शिक्षकांची टवाळी, अरे तुरे करत घरी जातात. मोबाईलवरून फक्त प्रेमाच्या, सेक्सच्या, पटवापटवीच्या वार्ता चालतात. ही 'चालू' आहे, ती बाई नांदत नाही, एकटी असते. असल्या गप्पा! हे काय जीवन आहे? हे विडंबन आहे.

ही युवाशक्ती चांगल्या कार्यासाठी पुढारलेल्या विचारांसाठी कधी पुढे येताना, साखळी बांधताना मला कोकणात दिसली नाही. शहरात पुण्यात वेगळे चित्र असेल तर आनंद आहे. कायदे, नियम गुंडाळून ठेवणे तर महाराष्ट्रात सर्रास चालते.

मनात विस्तव मावेना तेव्हा भगतसिंह सारखे स्फोटक विचारांचे नास्तिक क्रांतिवीर स्वराज्याच्या चळवळीत उतरले. त्यामुळे इंग्रजांचा तोरा आणि चेहराही 'उतरला' असणार. हे 'तेज' मला कुठे दिसत नाही. स्कॉलर पोरगा कॅमेरासमोर येतो, मुलाखत देतो पण तो नंतर दोस्तांसाठी, समाजासाठी काय करतो? पुढच्या मोठ्या स्पर्धेत टिकतो का? स्वत:चा चिमणाचिमणीचा प्रपंच तेवढा करतो.

देशासाठी पूर्णवेळ समाजकार्य कोण करतो? आगाऊपणा करणारी जी ओव्हरस्मार्ट मुले 'मीडिया आपणच सांभाळतो' अशा भ्रमात मला दिसली. त्यांना चार ओळी शुद्ध लिहिता येत नाहीत की रोजच्या जीवनात अंधविश्वास आणि दैववाद टाळता येत नाही. या पिढीची 'नेट'वाली आधुनिकता वरवरची आहे. मनातून ही पिढी जातीयवादी व अंधश्रद्धाळूच आहे. म्हणूनच महाराष्ट्राला नीट दिशा मिळालेली नाही.

जेव्हा अन्यायाच्या, भ्रष्टाचाराच्या, बुवाबाजीच्या विरोधात युवाशक्ती जागी होईल तेव्हाच दुर्जनांना पळता भूई थोडी होईल. आज मात्र सज्जनच जास्त त्रास सोसत आहेत.

◆ **माधव गवाणकर**
दापोली (रत्नागिरी)
९१४५९२४०५३

# माऊलींच्या प्रस्थान सोहळ्यासाठी आळंदी नगरपालिकेचा नियोजन आराखडा

**आळंदी, (वार्ताहर) :** संत ज्ञानेश्‍वरमहाराजांच्या पालखीचा प्रस्थान सोहळा ९ जुलै रोजी रात्री ९ वाजता होणार आहे. त्यानिमित्त आळंदीत येणाऱ्या लाखो भाविक-भक्त व यात्रेकरुंना मूलभूत नागरी सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आळंदी नगरपरिषदेच्या वतीने नियोजन आराखडा तयार करण्यात आला असून, पालखी सोहळ्याच्या व्यवस्थेसाठी नगरपरिषद प्रशासन सज्ञ झाले आहे.

यात्रा नियोजनासाठी नियंत्रण कक्ष, आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य व स्वच्छता विभाग, पाणीपुरवठा विभाग, अतिक्रमण विभाग, वसुली विभाग, विद्युत विभाग, संरक्षण विभाग असे विभागनिहाय पथके तयार करण्यात आली आहेत. त्या त्या पथकासाठी नियुक्त कर्मचारी त्या त्या विभागाचे काम व जबाबदारी स्वतंत्रपणे सांभाळणार आहेत. नियंत्रण कक्षासाठी चार कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यात्रा काळात नियुक्त सर्व विभागाची समन्वय राखण्याची भूमिका बजावण्यात येणार आहे. याच विभागामार्फत सर्व विभागाच्या कामकाजाची माहिती ठेवणे, यात्रेसंबंधी पत्रव्यवहार करणे, वारकऱ्यांकडून आलेल्या तक्रारी व सूचनांच्या अंमलबजावणीसाठी संबंधित विभागांना माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे.

आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत खेड तालुका हद्दीमध्ये इंद्रायणीच्या घाटावर आपत्ती व्यवस्थापनाची उभारणी करण्यात येणार आहे, तर हवेली तालुक्याच्या हद्दीमध्ये 'वाय' जंक्शनला आपत्ती व्यवस्थापनाची उभारणी करण्यात येणार आहे. या कक्षात विविध सूचनांचे फलक लावण्यात येणार असून, भाविकांना सूचना देण्यासाठी स्पीकरची सोय करण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी वैद्यकीय विभाग व पोलीस यंत्रणेचे मदत केंद्र उभारले जाणार आहे. वीज, दूरध्वनी, न. प. महसूल प्रशासन, पोलीस निरीक्षक, वैद्यकीय अधिकारी, अग्निशमन दल या यंत्रणेची प्रामुख्याने उभारणी करण्यात येणार आहे, तर नदीमध्ये बोट, लाइफ जॅकेट घातलेली पोहणारी व इतर आपत्कालीन यंत्रणा उभारण्यात येणार आहे.



# नारंगवाडीत समाधान मेळाव्याने शेतकरी समाधानी

**नारंगवाडी, (वार्ताहर) :** उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग व महसुल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महसुल मंडळ नारंगवाडी येथे शेतकरी समाधान मेळाव्यास शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

या मेळाव्याचे उद्घाटक आ. ज्ञानराज चौगुले, प्रमुख मार्गदर्शक सुभाष चोले, प्रकल्प उपसंचालक (आत्मा) धाराशिवचे एच. आर. गोरे, ता. कृषी अधिकारी एन. व्ही. जोशी, कृषी आ. उमरगा, संतोष बनकर, नायब तहसीलदार बी. बी. ढोबळे, हैद्राबाद बँक माडजचे शाखाधिकारी डॉ. एस. सी. जाधव, पशुसंवर्धन विभाग श्रीमती एस. नरहिरे, सहाय्यक उपनिबंधक, सरपंच फुलाबाई घंटे, उपसरपंच दिलीप पवार आदी उपस्थित होते.

नारंगवाडी, नाईचाकूर, सावळसूर, मातोळा, बाबळसूर आदी गावातील शेतकरी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सुभाष चोले यांनी शेतकरी गट, पाण्याचे व्यवस्थापन, पाणी आडवा, सेंद्रीय शेती, गटामार्फत होणारा फायदा याची माहिती शेतकऱ्यांना दिली. पशुसंवर्धन अधिकारी डॉ. जाधव यांनी पशुच्या आजार, चारा व्यवस्थापन, दुग्ध वाढीसाठी लसीकरण आदींची माहिती दिली. हैद्राबाद बँक माडजने दत्तात्रय गडाळे या शेतकऱ्याचा सातबारा कोरा करुन दिला. बँकेच्या विविध योजना शेतकऱ्यांना सांगितल्या. कृषी अधिकारी एच. आर. गोरे यांनी मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनामुळे शेतकरी समाधानी झाल्याचे दिसून आले.

सुत्रसंचलन गोपाळ आपटे यांनी केले. कृषी सहाय्यक पी. के. पाटील, एम. एन. डांगे, अरुण मस्के, जयदेव पवार, विठ्ठल चिकुंद्रे, जी. पी. सुर्यवंशी, प्रदीप भोसले, रवि पाटील, शेखर घंटे आदी शेतकरी उपस्थित होते. संतोष पुरी यांनी सोयाबीन उगवण तपासणी व बिजप्रक्रिया करुन दाखवली.

# बातम्या मनोरंजकतेने मांडण्याच्या ट्रेंडबद्दल चिंता



**पुणे, (प्रतिनिधी) :** बातम्या मनोरंजक पद्धतीने दाखवण्याचा वृत्त वाहिन्यांचाचा मोह अलीकडच्या काळात वाढत चालला आहे. त्याचबरोबर प्रेक्षक देखील अशा मनोरंजक पद्धतीने मांडल्या जाणाऱ्या बातम्यांना अधिक पसंती देत आहेत. हा बदल चिंताजनक असल्याचे मत झी २४ तास आणि डीएनएचे संपादक डॉ. उदय निरगुडकर यांनी व्यक्त केले.

पुण्यात डॉ. उदय निरगुडकर यांना देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

आद्य पत्रकार देवर्षी नारद जयंती दिवशी हा पुरस्कार दिला जातो. डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि विश्व संवाद केंद्र, पुणे यांच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो. केंद्रीय मंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांच्या हस्ते निरगुडकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी विश्व संवाद केंद्र, पुणेचे अध्यक्ष मनोहर कुलकर्णी, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे विकास काकतकर उपस्थित होते. इंदुमती गणेश, वैजनाथ दुलंगे यांना देखील यावेळी गौरविण्यात आले.

देश सकारात्मक मार्गावर चालला आहे. त्यात माध्यमांची महत्त्वाची भूमिका राहणार आहे, असे मत नक्वी यांनी यावेळी व्यक्त केले. पत्रकारीतेत, समाजात, तंत्रज्ञान यामध्ये अनेक बदल झाले आहेत, मात्र पत्रकारांची अर्थिक स्थिती बदललेली नाही, याविषयी नक्वी यांनी खंत व्यक्त केली.


## झलक 'साहित्य चपराक' जून २०१५



**वार्षिक वर्गणी**
**मासिकासाठी : ५०० ₹**

६१७, 'साईकृपा', पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.
दूरध्वनी: ०२०-२४४६०९०९, ९५५२८५८१००

**या अंकात काय वाचाल?**

- बाळासाहेब ठाकरे नावाचे रसायन/ **महेश मांगले**
- मराठवाडा साहित्य परिषद निवडणूक/ **डॉ.भास्कर बडे**
- भारतीय शेतकरी व भूमी अधिग्रहण/ **मच्छिंद्र कामंत**
- वंदन निसर्गदेवतेला/ **कविता मालपाणी**
- जागर महापुरुषांचा / **अरूण कोटगी**
- भारतीयांच्या तांत्रिक भराऱ्या / **संजय सोनवणी**
- माय माईंड, माय चॉईस... / **आसावरी इंगळे**
- आठवणीतील पाने / **संजय वाघ**
- स्पर्श : डबा / **व्यंकटेश कल्याणकर**
- घरपण / **माधव गिर**
- पाणी समस्येवर तोडगा काय / **जगन्नाथ कुलकर्णी**
- ओथंबलेले घन / **नरेंद्र नाईक**
- माणूस खरंच चंद्रावर गेला का?/ **समीर नेर्लेकर**

- **ग्रंथ परिचय**

धडपडणाऱ्या शिक्षकाची... : **बालाजी इंगळे**
भावभावनांचे प्रतिबिंब : **सुवर्णा जाधव**

याशिवाय दर्जेदार कवितांची मेजवानी


## 'पाकिस्तानला आंध्रच्या मिरचीचा झटका'

**नवी दिल्ली :** काश्मीरमधील दहशतवाद प्रतिदहशतवादानेच संपविण्याच्या संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या वक्तव्यावर टीका करणाऱ्या पाकिस्तानचा संरक्षणमंत्र्यांनी चांगलाच समाचार घेतला. पाकिस्तानला मिरचीचा झटका लागला आहे आणि तीदेखील आंध्रची तिखट मिरची आहे. पाकिस्तानला काय वाटत असेल याबाबत मला अधिक सांगण्याची इच्छा नाही, अशी सडेतोड प्रतिक्रिया पर्रीकर यांनी व्यक्त केली.

काश्मीरमध्ये सुरू असलेल्या पाकपुरस्कृत दहशतवादाबद्दल बोलताना, तेथील दहशतवाद संपविण्यासाठी प्रतिदहशतवादाचा पर्यायही स्वीकारार्ह असल्याचे पर्रीकर यांनी एका मुलाखतीत सांगितले होते. या वक्तव्यावर पाकिस्तानने थयथयाट केला होता. पाकिस्तानच्या भारताशी असलेल्या सीमेवरील भागात सुरू असलेल्या दहशतवादी कृत्यांमध्ये भारताचा हात असल्याचेच स्पष्ट होते, अशी प्रतिक्रिया पाकिस्ताने या वक्तव्यावर व्यक्त केली होती. आता पाकिस्तानचे लष्करप्रमुख राहिल शरीफ यांनी पाकिस्तान आणि काश्मीर कधीच वेगळे होऊ शकत नसल्याचे म्हटले.


## नेत्रदान करा!




- भारताची लोकसंख्या : ११८ करोड
- रोज मृत पावणाऱ्यांची संख्या : ६२,३८९
- रोज जन्म घेणाऱ्यांची संख्या : ८६,८५३
- भारतातील अंध लोकांची संख्या : ६,८२,४९७

जर रोज मृत होणाऱ्या लोकांनी आपले नेत्रदान केले तर फक्त १२ दिवसात भारतातील सर्व अंध हे जग बघू शकतील...

**तुमच्या डोळ्यांचे दान करून इतर गरजूंना ही सृष्टी पाहण्याची संधी द्या!**

सुकांता™

**विजयकुमार मर्लेचा**, विश्वस्त सुकांता चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे



'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी वेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्वांकुर हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : घनश्याम वसंतराव पाटील.** (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही) (वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)